Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १२ • Title - Code :- MAHMAR4951 • बुधवार दि.२७ सप्टेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### मुख्यमंत्र्यांकडे शिवसेना(उबाठा) व काँग्रेसची मागणी

# युवकांना गुलामगिरीकडे नेणारे कंत्राटी भरतीचे परिपत्रक रद्द करा

## तहसील कार्यालया समोर परिपत्रक जाळून केली होळी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

शिक्षणाचा अधिकार हा संविधानानें दिलेला आहे. देशाचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल तर सर्वांना शिक्षण मिळायला हवे.शहरी व ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत मध्यम व गरीब जनता शिक्षण घेतात. विशेष म्हणजे याकरिता स्वतंत्र मंत्रालय व बजेटची तरतूददेखील अर्थसंकल्पात करण्यात येते.परंतु आता हेच शिक्षण देणगीदारांवर अवलंबून राहणार आहे.

दुसरीकडे सामान्य परिवारातील युवक स्पर्धा परीक्षेचे शिकवणी वर्ग लावून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतात. परंतु आता त्या जागादेखील खाजगी कंपनीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या दोन परिपत्रकामुळे युवकांना गुलामगिरीच्या खाईत नेणारे आहे. त्यामुळे हे दोन त्वरित परिपत्रक रद्द करण्याची मागणी राजुरा विधानसभेचे आमदार सुभाष धोटे तसेच







चंद्रपूर शिवसेना जिल्हा प्रमुख (उबाठा) संदीप गिर्हे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडुरवार,काँग्रेसचे युवा कार्यकर्ता राजू झाडे यांच्या नेतृत्वात राज्यसरकार विरोधात निदर्शने करत तहसीलदार शिवाजी कदम यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दि.(२६) मंगळवारी कंत्राटी भरती रद्द करण्याची मागणी केली आहे.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडुरवार,युवा कार्यकर्ता राजू झाडे,उपनगराध्यक्ष सारिका मडावी,नगरसेवक यादव बांबोळे,नगरसेवक वनिता वाघाडे, काँग्रेस तालुका कार्याध्यक्ष निलेश संगमवार,व्यापारी गोंडपीपरी संघटना अध्यक्ष अजय माडुरवार,बबलू कुळमेथे,प्रा रमेश हुलके,माजी उपसरपंच गौतम झाडे,शिवसेना शहर उपप्रमुख रियाज कुरेशी,युवासेना तालुका प्रमुख तुकाराम सातपुते,युवासेना शहर उपप्रमुख शुभम मेश्राम,शिवसेना तालुका उपसंघटक अशपाक कुरेशी,जोगापूर शिवसेना शाखा प्रमुख पंकज डांगी,काँग्रेस तालुका उपाध्यक्ष नितेश मेश्राम,प्रशांत कोसनकर,युवराज बांबोळे,माजी उपसरपंच सारनाथ बक्षी,भुवन देवगडे,साहिल फुलझले,प्रफुल वाळके,निखिल खोब्रागडे,संतोष झाडे,मंथन मानकर,माजी सरपंच निर्मला निमगडे,सौरव उराडे,प्रवीण कलगंटीवार,संदीप रामटेके यांच्यासह शिवसेना,काँग्रेसचे व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# चेरपल्ली नाल्यावर पूल तसेच नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून द्या

## माजी मंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांना दिले निवेदन

**अहेरी । प्रतिनिधी**

येथील नगरपंचायत क्षेत्रात समाविष्ट असलेल्या चेरपल्ली येथे थोड्याशा पावसानेही नाल्यावरून पाणी वाहते, त्यामुळे रहदारीला अडथळा होतो. ये-जा करणाऱ्या नागरिकांना यामुळे चार किलोमीटरचा फेरा मारावा लागत आहे. दरम्यान, गावकऱ्यांनी २४ सप्टेंबरला माजी मंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांची भेट घेऊन कैफियत मांडली.

शहरापासून अवघ्या एक किलोमीटरवर चेरपल्ली गाव आहे. तेथे नाल्यावर पूल नसल्याने अवागमन करणाऱ्यांना चार किलोमीटरचे जास्तीचे अंतर कापून जावे लागत आहे. त्यामुळे वेळ, इंधन वाया जाते व मनस्ताप सहन करावा लागत आहे. तातडीने चेरपल्ली नाल्यावर नवीन पुलाची निर्मिती करावी अशी मागणी निवेदनातून माजी मंत्री अम्ब्रीशराव



आत्राम यांच्याकडे गावकऱ्यांनी केली. विशेष म्हणजे गावातील कोणत्याही नागरिकांकडे राहत्या घराच्या मालकी हक्काचे दस्तावेज नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत आहे, प्रधानमंत्री आवास योजनाचा लाभही जनतेला अद्याप मिळत नाही, सर्वेक्षण करून आखीव पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली . दरम्यान, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही आत्राम यांनी गावकऱ्यांना दिली.

### ओबीसींसाठीही तत्परता दाखवा

# चंद्रपुरातील आंदोलकांचा राज्य सरकारला टोला

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करू नये या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी विद्यार्थी महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र टोंगे यांचे मागील १६ दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. अजूनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्याशी संपर्क साधला नाही. मराठा आणि धनगर समाजासाठी सरकारचा निरोप घेऊन जाणारे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन चंद्रपूरकडे फिरकले नाही. मराठा, धनगर समाजाप्रमाणे ओबीसींसाठीही सरकारने तत्परता दाखवावी, असा टोला राष्ट्रीय ओबीसी महासंघाने लगावला आहे.

टोंगे यांनी ११ सप्टेंबरपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांची हृदयगती, रक्तदाब आणि साखरेची पातळी खालावल्याने त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले. त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. मात्र त्यांची




प्रकृती चिंताजनक आहे. आता उपोषणस्थळी विजय बलकी व प्रेमानंद जोगी यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. अजूनही राज्य सरकारने यावर कुठलाही ठोस निर्णय जाहीर केला नाही. त्यामुळे ओबीसी आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. येत्या ३० सप्टेंबरला चंद्रपूर जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. यातच मंगळवारी धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या मुद्द्यावरून आंदोलन करणाऱ्यांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. गिरीश महाजन सरकारचा निरोप घेऊन गेले. चंद्रपूरला पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार वगळता अजूनही कुठल्याही मंत्र्याने भेट दिली नाही. दिवसागणिक वातावरण तापू लागले असतानाही सरकारकडून अपेक्षित हालचाली केल्या जात नसल्यावरून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी संताप व्यक्त केला आहे. येत्या निवडणुकीत सरकारला ओबीसी समाज नक्कीच धडा शिकविणार, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला राजमाता यांचा वाढदिवस

## चाहत्यांची एकच गर्दी अन शुभेच्छांचा वर्षाव;अहेरी राजवाड्यात चाहत्यांचा मोठा जल्लोष





**अहेरी । प्रतिनिधी**

इस्टेटच्या राजमाता, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य तथा विदर्भातील नामांकित धर्मराव शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा राजमाता राणी रुक्मिणी देवी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.वाढदिवसानिमित्त चाहत्यांची राजवाड्यासमोर सकाळपासूनच एकच गर्दी केली होती.त्यात भाजप चे पदाधिकारी,घरचे मंडळी एवढेच नव्हेतर दुर्गम भागातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.सध्या राजवाडा परिसरात गणरायाचे प्रतिष्ठपणा करण्यात आल्याने याठिकाणी आरती आणि विविध कार्यक्रमांना नागरिकांची एकच गर्दी होत आहे.

त्यात राणी साहेबांचा वाढदिवस असल्याने सर्वांचा आनंद द्विगुणित झाला होता. वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात रोषणाई,आतिषबाजी,ढोल-ताशाच्या गजरात तसेच रात्रीच्या सुमारास दुर्गम भागातील आदिवासी बांधवांनी रेल्ला नृत्य सादर करत सर्वांचे लक्ष वेधले व संपूर्ण अहेरी राजनगरी दणाणून सोडले.राज घराण्याकडून आलेल्या शुभचिंतकांसाठी हिंगणघाट येथील डोंगरे यांच्या भक्तीगीत पर सुगमसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच समस्त राज घराण्यातील अहेरीचा राजा गणेश मंडळाला भेट देणाऱ्या भक्तांसाठी व शुभेच्छांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाला नागरिकांनी हजारोंच्या संख्येने हजेरी लावली होती.राजमाता राणी रुक्मिणी देवी यांनी समस्त उपस्थितांचे आभार मानले. यावेळी राज घराण्याशी संबंधित निष्ठावंत प्राचार्य डॉ. मनोरंजन मंडल, प्राचार्य मारोती टिपले,संतोष उरेते,गिरीश मद्देरलावार,प्राचार्य अनिल भोंगळे,प्राचार्य संजय कोडेलवर, सेवानिवृत्त प्राचार्य विजय खोंडे,प्राचार्य अरुण गोटेफोडे,प्राचार्य तगरे,मुख्याध्यापक तालिब सय्यद,मुख्याध्यापक अनिल यावले, मुख्याध्यापक वांढरे, मुख्याध्यापक दीपक राय व दिलीप राय, मुख्याध्यापक प्रभाकर भुते, मुख्यध्यापक उराडे, प्रा रमेश हलामी, प्रा.तानाजी मोरे,प्रा.अतुल खोब्रागडे, प्रा.गोंडे ,पर्यवेक्षक युवराज करडे, पर्यवेक्षक हंसराज खोब्रागडे,आदर्श राज्यस्तरीय शिक्षिका जयश्री विजय खोंडे, व्यापारी संघटनेतील इतर सदस्यगण, प्रकाश गुड्डेल्लीवार,रवी नेलकुद्री,अमोल गुड्डेल्लीवार,संतोष मद्दीवार, विनोद जिल्लेवार, विकास तोडसाम, राकेश कोसरे,नगरसेवक विकास उईके,माजी नगरपंचायत अध्यक्ष हर्षताई रवींद्र ठाकरे,नगरसेविका शालिनी पोहणेकर, नगरपंचायतचे आजी-माजी नगरसेवक,भारतीय जनता पार्टीचे गडचिरोली तथा अहेरी विधानसभा क्षेत्रातील पाचही तालुक्यातील आलेले पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घेतलेले विविध सामाजिक उपक्रम

राणी रुक्मिणीदेवी यांच्या वाढदिवसानिमित्त माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी गणेश मंडळाला रुग्णवाहिका वाटप,शेतकऱ्यांना बैलजोडी वाटप,गरजूंना कपडे वाटप,सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्यांना आकर्षक बक्षीस व रोख रक्कम वाटप केले. एवढेच नव्हे तर सकाळपासून भाजपच्या कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले तर बरेच ठिकाणी रुग्णांना फळ वाटप करून राणी साहेबांचा वाढदिवस जल्लोषात साजरा केला.

### भला मोठा केक कापून वाढदिवस साजरा

अहेरी उपविभागातील राजघराण्याशी संबंधित गणमान्य व्यक्ती, स्थानिक व्यापारी संघटना,विविध सामाजिक संस्थांची तथा पक्षांचे पदाधिकारी तसेच धर्मराव शिक्षण मंडळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नगरातील वार्डा-वार्डातील महिलांनी पुष्पगुच्छ व भेट देऊन राज माता राणी रुक्मिणी देवी यांच्यावर शुभेच्छांच्या वर्षाव केला.तर राजे अम्ब्रीशराव आत्राम आणि कुमार अवधेश राव बाबा आत्राम दोन्ही सुपत्रांनी आणि राजमाताच्या लहान बहीण राजकुमारी विजयश्री सिंह,प्रवीणराव बाबा,चित्तेश्वर बाबा,विश्वनाथबाबा आत्राम, वैभव सोमकुवार या सर्वांनी भला मोठा केक कापून राणी रुक्मिणी देवी यांचा वाढदिवस साजरा केला.

# निर्माल्य संकलन आणि खतनिर्मिती




गौरी, गणपती, दुर्गोत्सव अशा विविध सणांची सध्या रेलचेल सुरू आहे. घराघरांत हे उत्सव मोठ्या आनंदात सर्वत्र साजरे होत आहेत. आनंदोत्सव साजरा करत असताना आपल्याला एकीकडे धार्मिक प्रथा, परंपरांचे जतन करायचेच आहे. त्यासोबतच पर्यावरणाचेही रक्षण करायचे आहे. धार्मिक उत्सवात दररोज पूजा करताना विविध रंगांची फुले, पाने मूर्तीला अर्पण केली जाते. पुढील पूजेच्यावेळी आधी वाहिलेली ही सर्व पाने, फुले आपण बाजूला काढून नवीन फुला, पानांनी पूजा अर्चना करत असतो.मूर्ती जवळील काढून ठेवलेली ही शिळी पाणे, फुले म्हणजे निर्माल्य होय. निर्माल्य म्हणजे देवी देवतांना वाहिलेली ही फुले. हार, बेल, दुर्वा, पाने इत्यादी पवित्र वनस्पतीचा शिळे झाल्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या पूजेवेळी त्यावेळेला ढीग होय असेही म्हणता येईल. या निर्माल्याचे तलावात, विहीरीत किंवा वाहत्या पाण्यात विसर्जन करण्याची आपल्याकडे पद्धत आहे. देवीदेवतांना वाहिल्यामुळे त्यास पवित्र समजतात. त्यामुळे ते पायदळी तुडवत नाही. गणेशोत्सवाच्या काळात दुर्गादेवीच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माल्य तयार होते. विसर्जनाच्या वेळी हे निर्माल्य जलाशयामध्ये गेल्यास जलाशय प्रदूषित होतात. बरेचदा तेच पाणी प्यावे लागल्याने त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या जलाशयाचे प्रदूषण टाळले जावे म्हणून विविध संस्था आणि पर्यावरणप्रेमी नागरिक निर्माल्य संकलनाला हातभार लावत आहेत .अलीकडे निर्माल्याचे महत्व लक्षात आल्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था सुद्धा निर्माल्य संकलन कार्यात सहभागी होतात आहे. निर्माल्य गोळा केल्यानंतर त्याचे करायचे काय? असा अनेकांना प्रश्न पडू शकतो. निर्माल्यामुळे होणारे पाण्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी अलीकडे निर्माल्याचे सार्वजनिक जलसाठ्यात विसर्जन न करता याचा उपयोग कंपोस्ट अर्थात घरगुती खत निर्मितीसाठी केला जातो. कारण हेच खत फुल, फळझाडांना देऊन उत्तम प्रतीची फुले, फळे निर्मिती करता येते.पुढे हीच फळे फुले देवाला अर्पण करता येतात. त्यामुळे निर्माल्याचे नदी,तलावात विसर्जन करण्याऐवजी खत तयार करण्याकडे अनेकांचा



कल वाढलेला दिसतो. गौरी गणपती म्हटल्यावर रोजच्यारोज पूजेचे निर्माल्य जमा होणारच आहे. या निर्मल्यापासून आपल्याला उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत बनवता येते. त्यापासून फायदाच फायदा करता येतो. झाडांना फळे फुले भरपूर प्रमाणात येतील आणि मुख्य म्हणजे या निर्माल्यापासून सार्वजनिक ठिकाणी कचरा देखील होणार नाही. महागडी खते विकत घेऊन झाडांना देण्यापेक्षा या निर्मल्यापासून बनवलेली सुपीक खते कधीही चांगली. त्यात पैशाची बचत होईलच परंतु पर्यावरणाचेही रक्षण होईल. घरातल्या, बागेतल्या झाडांना या खताच्या माध्यमातून आपण नवसंजीवनी देऊ शकत असल्याने अलीकडे पर्यावरणप्रेमी नागरिकांचा निर्माल्यापासून खत निर्मितीकडे कल मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. यातून स्वार्थातून परमार्थ साधता येईल. यातून आपण खत निर्मिती तर करतोच परंतु पर्यावरणाचे रक्षणही करतो. निर्माल्यापासून खत निर्मिती कशी करावी? असा प्रश्न अनेकांना पडण्याची शक्यता आहे. ते अगदी सोपे आहे.प्लास्टिकची कुंडी, रंगाचा डबा किंवा मातीच्या कुंडीला छिद्र पाडायचे. कुंडीत सुरुवातीला विटांचे तुकडे, नारळाच्या शेंड्या घालायच्या. त्यावर वाळलेली पाणे घालायची. त्याचा एक थर दिल्यानंतर गणेशोत्सव अथवा दुर्गोत्सवा साठलेल्या पानांचा एक थर द्यावा . उदाहरणार्थ फुलांच्या पाकळ्या काढून घ्या. यानंतर बाकीचा एक थर द्या. त्यानंतर पुन्हा मातीचा थर द्यायचा. संपत नाही तोपर्यंत हीच प्रक्रिया पुन्हा पुन्हा करत राहायची.माती घालून झाल्यानंतर थोडेसे पाणी शिंपडावे. त्यानंतर ही कुंडी झाकून ठेवा. फक्त आठ ते पंधरा दिवसानंतर हे मिश्रण हलवायचे. मिश्रण काळपट पडल्यावर त्याचा बारीक चुरा करून घ्यावा. नंतर मात्र थोडे थोडे करून ते झाडाच्या कुंडीमध्ये टाकावे. या खताचा वापर केल्यानंतर आपल्याशी लक्षात येईल की, बाजारातून आणलेल्या रासायनिक खतांपेक्षा घरच्याघरी बनवलेले कंपोस्ट खत अतिशय परिणामकारक आहे.हे खत फळे व फुलझाडांना वाढण्यास मदत करतात. यातून आपण पर्यावरणाचे रक्षण तर करतोच.पण परमार्थही साधू शकतो. घरच्याघरी कमी बजेटमध्ये झाडांसाठी लागणारे खत बनवून पैशाची बचत करता येते.स्वार्थ आणि परमार्थ याचे मिश्रण म्हणजे निर्माल्यापासून बनविलेले खत होय. सुजाण नागरिकांनी निर्माल्यापासून घरच्या घरी खत बनविण्याची ही प्रक्रिया निरंतर करायला हरकत नाही.

## अन्यथा आदिवासी समाजातर्फे तीव्र आंदोलन

# आदिवासी एकता आघाडीने दिला इशारा मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांना निवेदन

**अहेरी । प्रतिनिधी**

धनगर समाजाला आदिवासींचे आरक्षण दिल्यास विकासापासून कोसो दूर असलेल्या खऱ्या आदिवासींच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासावर खूप मोठा परिणाम होईल,वास्तविक पाहता धनगर हे आदिवासी नाहीत म्हणून अनेक अभ्यास समितीचे अहवालातुन सिद्ध झाले आहे, तरीही आदिवासींच्या सोयींसवलतीत धनगर समाजाच्या समावेश करण्याचे धोरण घटनाबाह्य आहे असे झाल्यास अन्याया विरोधात संपूर्ण राज्यभरात आदिवासी एकता आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा आदिवासी एकता आघाडी पदाधिकाऱ्यांनी ना.धर्मराव बाबा आत्राम यांना दिलेल्या निवेदनातुन दिला आहे.

अहेरी विधानसभा क्षेत्रातील आदिवासी एकता आघाडीच्या वतीने राजवाडा येथील सभागृहात जिल्ह्यातील विकासात्मक विषयावर सविस्तर चर्चा करून राज्याचे अन्न व औषध प्रशासन कॅबिनेट मंत्री नामदार धर्मरावबाबा आत्राम यांना पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर केले आहे.तत्पूर्वी तालुका मुख्यालयातील माता कन्यका मंदिर सभागृहात आयोजित आदिवासी समाज बांधवांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक विषमतेच्या चर्चा करण्यात आले.यात



प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थितींना मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर आदिवासी एकता आघाडी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात राजवाडा येथे ना.धर्मराव बाबा आत्राम यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.यावेळी माजी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष भाग्यश्री आत्राम, माजी पंचायत समिती सदस्य हर्षवर्धनबाबा आत्राम,आदिवासी एकता आघाडीचे अध्यक्ष इंदरशाह मडावी, उपाध्यक्ष लक्ष्मण नरोटे, सचिव कैलाश कोरेत, कोषाध्यक्ष समय्या कुडमेथे, सल्लागार सांबय्या करपेत,सहसचिव मारोती पल्लो, सदस्य बालाजी गावडे,संभाजी हिचामी ,बाबुराव तोरे,मांतय्या आत्राम, राजू आत्राम,शंकर आत्राम, नागेश पेंदाम,राजू नरोटे, बेबीताई लेखामी,ललिता हिचामी, नामदेव कुसनाके, तिरुपती मडावी, मधुकर आत्राम,राकेश तोरे, वासुदेव कोडापे,निलेश लेखामी,सूर्यकांत आत्राम,विनायक आलाम,श्रीनिवास गावडे ,विनायक वेलादी,श्रीहरी आलाम, दसरु मटामी,अश्विन मडावी,प्रमोद कोडापे,तुकाराम नैताम, योगेश तलांडे,तेजु कुडमेथे, दिलीप कुमराम,दादाजी गेडाम, महेश कुमराम,संतोष नरोटे, राकेश कवडो,मुन्ना पुंगाटी,नामदेव सडमेक,आदी पदाधिकाऱ्यांसह अहेरी विधानसभा क्षेत्रातील भामरागड,एटापल्ली ,मूलचेरा, सिरोंचा, अहेरी या पाचही तालुक्यातील आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारीशक्ती वंदन विधेयक पारित होणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मोठे यश : खा.नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

देशाच्या राजकीय इतिहासात मागील ६० वर्षांपासून महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेत आमदार किंवा खासदार म्हणून संधी मिळाली नाही. पण विशेष अधिवेशनाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केंद्र सरकारच्या माध्यमातून नारीशक्ती वंदन विधेयक पारित करून महिलांना राजकीय क्षेत्रात ३३ टक्के प्रतिनिधीत्व देण्याचा मार्ग मोकळा केला आहे. त्यामुळे भविष्यात गडचिरोली जिल्ह्यातही आमदार-खासदार म्हणून महिलांना संधी मिळू शकेल, अशी प्रतिक्रिया खासदार अशोक नेते यांनी व्यक्त केली.

गडचिरोली विश्राम भवनात सोमवारी पत्रकार परिषदेत त्यांनी महिला विधेयकामुळे होणाऱ्या भविष्यकालीन राजकीय, सामाजिक परिवर्तनाची माहिती दिली. महिलांच्या सन्मानासाठी मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने उचललेले हे पाऊल यापूर्वी कोणत्याच सरकारला उचलता आले नसल्याचे ते म्हणाले. दिल्लीतील विशेष अधिवेशनात झालेल्या या ऐतिहासिक क्षणाचे आपण साक्षीदार होतो याचा अभिमान असल्याचे यावेळी खा. नेते म्हणाले. या विधेयकामुळे केवळ लोकसभेतच नाही तर सर्व विधानसभांमध्येही ३३ टक्के महिला सदस्य होतील. विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी




होऊन त्याचे कायद्यात रूपांतर करणे आणि इतर प्रक्रियेला वेळ लागणार असल्यामुळे या विधेयकाची अंमलबजावणी २०२९ च्या निवडणुकीपासून होऊ शकेल, असे खा. नेते म्हणाले.यावेळी त्यांनी सांगितले की आपण जर देशातील संख्येने मोठ्या असलेल्या राज्यातील विधानसभांमधील महिलांची सहभागिता लक्षात घेतली तर ४०३ सदस्य संख्या असलेल्या उत्तर प्रदेश विधानसभेत फक्त ३८ महिला आमदार आहेत जे तेथील महिला लोकसंख्येच्या ८ टक्के आहे. २८८ सदस्य संख्या असलेल्या महाराष्ट्र विधानसभेत फक्त ११ महिला आमदार आहेत जे तेथील महिला लोकसंख्येच्या ४ टक्के आहे. २९४ सदस्य संख्या असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभेत फक्त ३४ महिला आमदार आहेत जे तेथील महिला लोकसंख्येच्या १२ टक्के आहे. २४३ सदस्य संख्या असलेल्या बिहार विधानसभेत फक्त ३४ महिला आमदार आहेत जे तेथील महिला लोकसंख्येच्या १४ टक्के आहे. २३४ सदस्य संख्या असलेल्या तमिळनाडु विधानसभेत केवळ १७ महिला आमदार आहेत. जे राज्यातील महिला लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त ७ टक्के आहेत. २२४ सदस्य संख्या असलेल्या कर्नाटक विधानसभेत फक्त ३ महिला आमदार आहेत. जे राज्यातील महिला लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त १ टक्का आहे. भविष्यात या स्थितीत बदल होऊन निर्णय क्षमतेत ३३ टक्के महिला सहभागी होतील.यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे यांनी महिला व युवा आघाडीत नवीन पदाधिकाऱ्यांचा समावेश झाल्याचे यावेळी सांगितले. यावेळी आ. कृष्णा गजबे, ज्येष्ठ नेते बाबुराव कोहळे, किशन नागदेवे, प्रमोद पिपरे, प्रकाश गेडाम, गोविंद सारडा, रविंद्र ओल्लालवार, महिला आघाडीच्या प्रदेश सचिव रेखा डोळस, माजी नगराध्यक्ष योगिता पिपरे, वर्षा शेडमाके यांच्यासह अनेक महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती .

# ‘एकात्म मानववाद’ अध्यासनासाठी बोधचिन्ह तयार करा

## पं.दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त खुल्या स्पर्धेची घोषणा



**गडचिरोली । प्रतिनिधी**

पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानववाद अध्यासन केंद्राच्या वतीने पं. उपाध्याय यांची जयंती सोमवार, २५ सप्टेंबर रोजी, गोंडवाना विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘एकात्म मानववाद’ अध्यासन केंद्रासाठी खुल्या बोधचिन्ह स्पर्धेची घोषणा करण्यात आली. येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत ईच्छुक कलावंतांनी या केंद्रासाठी बोधचिन्ह (लोगो) तयार करून विद्यापीठाला पाठवायचे आहे. तीन सर्वोत्कृष्ट बोधचिन्हांना अनुक्रमे५००१ रूपये, २००१ आणि १००१ रूपयांचे बक्षिस दिले जाणार आहे. पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विचारांचा सर्वांगीण अभ्यास तसेच प्रचार-प्रसार करण्याकरिता गोंडवाना विद्यापीठात पं. दीनदयाल उपाध्याय एकात्म मानववाद अध्यासन केंद्र सुरु करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा या केंद्राच्या वाटचालीत योगदान असावे आणि अध्यासन केंद्राच्या विकासात सर्वांनाच सहभागी होता यावे म्हणून पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अध्यासन केंद्राचे बोधचिन्ह ठरविण्याकरिता स्पर्धा अयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट बोधचिन्हाला पुढे अध्यासनाचे अधिकृत बोधचिन्ह म्हणून स्वीकारले जाणार आहे. पं. दीनदयाल उपाध्याय एकात्म मानववाद अध्यासन केंद्राच्या बोधचिन्हाची (लोगो) ही प्रतियोगिता सर्वांसाठी खुली असणार आहे. स्पर्धेचे रोख पारितोषिक प्रथम रु.५००१, द्वितीय रु.२००१ आणि तृतीय रु.१००१ तसेच स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. इच्छुकांनी १५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत बोधचिन्हासह आपले पूर्ण नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक आणि इमेल पीडीएफ स्वरुपात विरल.ीपळर्सीससारळश्र.लो या इमेल आयडीवर पाठवावे, असे आवाहन अध्यासन केंद्राच्या समितीने केले आहे. याप्रसंगी समितीची बैठकही आयोजित करण्यात आली. यावेळी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. बैठकीत समिती विस्ताराची चर्चा करण्यात आली आणि येत्या काळात या केंद्राच्या माध्यमातून अपेक्षित कार्याचा आराखडा ठरवला गेला. बैठकीला गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्यासह अध्यासनाचे प्रस्तावक संजय रामगिरवार, डॉ. संजय गोरे, प्रशांत दोंतुलवार, किरण गजपुरे, यश बांगडे, केंद्राचे समन्वयक डॉ. अनिरुध्द गचके उपस्थित होते.

# अनुसूचित जातीतील युवक-युवतींच्या स्वप्नांना गोंडवाना विद्यापीठाचे बळ

## बार्टी आणि गोंडवाना विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठातील सलंग्नित महाविद्यालयातील अनुसूचित जातीतील युवक-युवती स्वतःच्या पायावर उभे राहून ते स्वावलंबी व्हावेत, त्यांना कौशल्याचे बळ प्राप्त व्हावे, यासाठी बार्टीचे मोफत स्वरुपात स्पर्धा परीक्षेचे अनिवासी प्रशिक्षण वर्ग लवकरच कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात येणार आहे.

आज घडीला पुण्यासारख्या ठिकाणी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांचा विचार करायचा झाल्यास राहण्याची व्यवस्था, खानावळ, अभ्यासिका, पुस्तकं, क्लासेस यासारख्या गोष्टीसाठी खूप पैसे लागतात. यामध्ये क्लासेसची फीही भरपूर असते. याचबरोबर महिन्याला होणाऱ्या खर्चाचं प्रमाण जास्त आहे. जे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना न परवडणारं आहे.विद्यापीठातील अनुसूचित जातीच्या



विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण राबविण्याकरिता महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) यांच्याकडे प्रशिक्षणाकरिता येणारा खर्च तसेच इतर तत्समबाबींचा प्रस्ताव विद्यापीठाने सादर केलेला होता. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली असून गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि बार्टी यांच्यात सामंजस्य करार नुकताच झाला आहे.त्यानुसार प्रत्यक्षात अनुसूचित घटकातील युवा-युवतींसाठी स्पर्धा परीक्षेचे मोफत अनिवासी प्रशिक्षण वर्ग गोंडवाना विद्यापीठात सुरू होणार आहे. याकरिता अनुसूचित जातीमधील युवक-युवतींसाठी अनिवासी निःशुल्क स्पर्धा प्रशिक्षण वर्ग कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येणार आहेत. बार्टीचे केंद्र गोंडवाना विद्यापीठात सुरू व्हावे यासाठी कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी विशेष प्रयत्न केले आहे.हे प्रशिक्षण पूर्णतः निःशुल्क असून, प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च बार्टी पुणे मार्फत केला जाणार आहे.गोंडवाना विद्यापीठात अनिवासी प्रशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. इच्छूक प्रशिक्षणार्थीच्या प्राप्त अर्जामधून निकषांच्या आधारे अर्जाची छानणी करून निवडक उमेदवारांना प्रवेश दिला जाणार आहे.यामध्ये विद्यार्थ्यांना ६००० रुपयांचे शिष्यवृत्ती मिळेल.या संदर्भात नुकतीच एक सभा घेण्यात आली असून लवकरच प्रशिक्षण वर्ग प्रवेशाची प्रक्रिया सुरू होईल अशी माहिती या केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष सुरडकर यांनी दिली आहे.

# ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र घुग्घुस तर्फे पं. दीनदयाल उपाध्याय यांना अभिवादन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात सोमवार, २५ सप्टेंबर रोजी सकाळी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. मनोगत व्यक्त करतांना भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे म्हणाले, पं. दीनदयाल उपाध्याय एकात्म मानववादाचे प्रणेते, भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक व थोर विचारवंत होते त्यांनी अखंड भारताची संकल्पना केली होती त्यांच्या जयंतीनिमित्त मी अभिवादन करतो.यावेळी रामस्वामी पुनम, नितीन आमटे, मदन जंगम, सुनंदा आमटे, रेणुका सोळंके, सुषमा बोबडे, विशाखा पाटील, खुर्शीदा सिद्दीकी, ललिता पाटील, रंजना कमटकर, गोसाई चौधरी, विनोद जुनघरी, वसंत सोळंके, सुभाष गोखरे, किशोर गोहणे, विमल चौधरी, सुनंदा लिहीतकर, प्रीती धोटे, शीतल कामतवार, खुशबू मेश्राम, नेहा कुम्मरवार, स्वाती गंगाधरे व नागरिक उपस्थित होते.



# सह्याद्रीचा राखणदार





वरोरा येथील श्री. नूतन जुनघरे यांच्या घरातील गणरायाचे दर्शन घेतांना अमोल घाटे, सुरज चौधरी व निकेश मोटके



भद्रावती किल्ला वार्ड निवासी आनंद दिगंबर क्षीरसागर यांच्याकडील गणेशोत्सव






खासदार अशोक नेते यांनी भाजपाचे युवा कार्यकर्ते संजय बारापात्रे यांच्या घरगुती विघ्नहर्ता गणपती बाप्पाचे दर्शन घेतले




भद्रावती किल्ला वार्ड निवासी आनंद क्षीरसागर यांच्याकडील गणेशोत्सवात मित्रमंडळी



युवती सेनेच्या तालुका प्रमुख कु.तेजस्विनी प्रशांत हनुमंते यांच्या कडील गणेशोत्सव



जय बजरंग गणेश मंडळ नांदा ता. कोरपना (वर्षे ४२)



गडचिरोली जिल्ह्यातील दिलीप कौशिक मु.पो.येंगलखेडा ता. कुरखेडा यांच्याकडील गणेशोत्सव



२४ तास सेवा ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष तथा युवा पत्रकार लखन केशवाणी यांच्या कडील गणेशोत्सव



खुशाल कन्नोजवार करंजी तालुका वरोरा यांच्या कडील गणेशोत्सव



वरोरा येथील माजी नगरसेवक पंकज नाशिककर यांच्या कडील गणेशोत्सव



दोंदे नगर एकर्जूना येथील सौ.अल्का पचारे यांच्या कडील गणेशोत्सव



भद्रावती येथील श्री.अजय दर्वे यांच्या कडील गणेशोत्सव



घरगुती गणेशोत्सव सजावट रौप्य महोत्सवी वर्ष.....श्री.जगन्नाथ खराटे, ठाणे



सिंहगड रोड, पुणे येथील सौ.मंजुषा महेश पागे यांच्याकडील गणेशोत्सव



वरोरा येथील प्रणव उलमाले यांचे कडील गणेशोत्सव



कामगार नेते नरेंद्र अतकर वरोरा यांच्याकडील गणेशोत्सव



भद्रावती येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष विनायक येसेकर यांच्याकडील गणेशोत्सव



गणेशभक्त पार्थ

# दिव्यांगांच्या दारी अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद

## दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंद झळकविण्यासाठी कटिबद्ध–आ.बच्चू कडू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संपूर्ण देशात केवळ महाराष्ट्र सरकारने दिव्यांग मंत्रालय स्थापन केले आहे. अनेक आंदोलनातून हे मंत्रालय स्थापन करता आले, याचा अभिमान आहे. केवळ पाच महिन्यात दिव्यांग बांधवांच्या दारी हे मंत्रालय आले असून दिव्यांगांच्या चेह–यावर आनंद झळकविण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (मंत्री दर्जा) यांनी दिली.शकुंतला लॉन येथे दिव्यांग कल्याण विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित 'दिव्यांगांच्या दारी अभियानात' मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष पवार, जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब देशमुख आदी उपस्थित होते.दिव्यांगांचे अनेक प्रश्न आणि दुःख आहे, असे सांगून आ. बच्चू कडू म्हणाले, या कार्यक्रमाचे जिल्हा प्रशासनाने उत्तम नियोजन केले आहे. मात्र ऐवढ्यावरच न थांबता जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांग लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे. दिव्यांग बांधवांसाठी आपण अनेक आंदोलने केली. याच आंदोलनातून हे मंत्रालय उभे राहिले आहे. शेवटच्या श्वासापर्यंत आपण दिव्यांगांसाठी लढत राहणार आहोत. दिव्यांगांच्या घरापर्यंत योजना कशा पोहचविता येतील,





यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.पुढे आ .कडू म्हणाले, घरकूल, अंत्योदय, शौचालय या योजनांसोबतच येत्या दोन–तीन महिन्यात दिव्यांगांसाठी चांगल्या योजना आणल्या जातील. ग्रामीण स्तरावर काम करणारे ग्रामसेवक, कोतवाल, तलाठी, कृषी सहाय्यक, रोजगार सहाय्यक आर्दीनी या योजनांबाबत दिव्यांग बांधवांना अवगत करावे. केवळ शासन निर्णय म्हणून नाही तर कर्तव्य म्हणून काम करा. दिव्यांग तसेच निराधारांना १५०० रुपये महिना दिला जातो. मात्र कधीकधी चार–चार महिने पैसे मिळत नाही, ही शोकांतिका आहे. त्यामुळे महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधितांच्या खात्यात रक्कम जमा करावी, याकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधणारअसल्याचेत्यांनी सांगितले. दिव्यांग मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी चंद्रपूर जिल्हा परिषदेने विशेष अभियान राबविले आहे, हे नक्कीच कौतुकास्पद आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदनही यावेळी बच्चू कडू यांनी केले.मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, विविध योजनांचा लाभ, प्रमाणपत्रे यासाठी दिव्यांगांना फिरावे लागते. सर्व लाभ एकत्र देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसंख्येच्या सरासरी तीन ते पाच टक्के दिव्यांग असतात. आपल्या जिल्ह्यात दिव्यांगांची नोंदणी कमी आहे, त्यामुळे त्यांना शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागते. मात्र जिल्हा परिषदेमार्फत विशेष मोहीम राबवून दिव्यांगाची नोंदणी केली जाईल. दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून जिल्हा परिषदेने शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तपासणी मोहीम हाती घेतली आहे. राज्यात हा अभिनव प्रयोग फक्त चंद्रपूर जिल्ह्यानेच केला असल्याचे जॉन्सन यांनी सांगितले.प्रास्ताविकात डॉ. सुभाष पवार म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यात जवळपास १३ हजार दिव्यांगांची नोंदणी आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगर पालिका प्रशासन, सामाजिक न्याय, समाजकल्याण विभाग तसेच विविध विभागांमार्फत दिव्यांगांसाठी अनेक योजना राबविल्या जातात व लाभसुध्दा दिला जातो. जिल्ह्यात दिव्यांगांसाठी १२ शाळा असून त्यात ६५० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहे. तसेच येथे दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थी सिध्दार्थ टिपले यांना झेरॉक्स मशीन, सुनील गांगरेड्डीवार यांना मोटरपंप, फरान शेख, अर्णव अलोणे यांना व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. तसेच दिव्यांग उद्योजकांचा सत्कारसुध्दा करण्यात आला. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते दिव्यांगासाठी असलेल्या योजनांच्या माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच येथे लावण्यात आलेल्या विविध स्टॉलची बच्चू कडू यांनी पाहणी केली.कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून ब्रेल लिपीचे जनक ग्रॅहम बेल आणि डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी आनंदवन वरोरा येथील संधी निकेतन अपंगांची शाळा येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, कपिलनाथ कलोडे, जिल्हा पुरवठा अधिकारी अजय चरडे, सहाय्यक पांडूरंग माचेवाड यांच्यासह दिव्यांग प्रतिनिधी नीलेश पाझारे व इतर बांधव उपस्थित होते.

# ऑनलाईन बुकिंग करूनही गॅस सिलेंडर मिळेना

## गॅस एजन्सीचा लेटलतीफपणामुळे ग्राहकांना मनस्ताप; संबंधित गॅस एजन्सीवर कारवाईची मागणी

**अहेरी । प्रतिनिधी**

एकीकडे गॅस सिलेंडरच्या किमतीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने अगोदरच ग्राहकामधून नाराजी व्यक्त केली जात असताना दुसरीकडे गॅस एजन्सीकडे ऑनलाइन पेमेंट करूनही लवकर गॅस सिलेंडर पुरावठा होत नसल्याने ग्राहकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.एवढेच नव्हेतर गॅस सिलेंडरचे ऑनलाईन पैसे भरल्यानंतरही डिलिव्हरीच्या वेळेस वाढीव रक्कम मागून ग्राहकांची सर्रासपणे लूट सुरू असल्याने संबंधित एजन्सीवर कारवाई करण्याची मागणी आता ग्राहकांकडून केली जात आहे.एका ग्राहकाने १४ सप्टेंबर रोजी कन्यका गॅस एजन्सी,अहेरी येथे गॅस सिलिंडर बुक करून ऑनलाइन पेमेंट केले. ९६८ रुपये त्यांच्या खात्यातून कपात पण झाले. मात्र, तब्बल १२ दिवस उलटल्यानंतरही सदर ग्राहकाला अजूनपर्यंत गॅस सिलेंडर मिळाले नाही.दर महिन्याला याच परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याने अश्यावेळी एकच सिलेंडर असणाऱ्या ग्राहकांना तात्काळ सिलेंडर हवे असल्याने अडचणी निर्माण होत आहेत.वाढलेल्या गॅस दरात दिलासा देण्यासाठी नुकतेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रक्षाबंधन निमित्ताने २०० रुपये गॅस दर कमी करून बघिणींना मोठी भेट दिली आहे.त्यामुळे गृहिणींना थोडाफार दिलासा मिळनार असे वाटत होते.मात्र, पुरावठाधारकाकडून दर महिन्याला २० रुपये कुठलीही पावती न देता वसुलीचा गोरख धंदा सुरू आहे.त्यामुळे ग्राहकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.नियमाप्रमाणे सिलिंडर बुक करून त्याचे पेमेंट ऑनलाइन पद्धतीने केल्यावर अतिरिक्त रक्कम गॅस एजन्सी आकारू शकतच नाही. जर ती आकारायची असेल, तर तिचा समावेश मूळ किमतीत असला पाहिजे. जेणेकरून त्या रकमेवर सीजीएसटी व एसजीएसटीची आकारणी



होईल. परंतु ही रक्कम मूळ किमतीत समावेश न करता ग्राहकांकडून अतिरिक्त रक्कम वसूल केली जात आहे.त्यामुळे एका सिलेंडरच्या मागे २० रुपये प्रमाणे लाखो रुपये वसुलीचा धंदा सुरू असल्याने हा पैसा कोणाच्या खिशात चालला असा सवाल उपस्थित होत आहे.गॅस एजन्सी वितरक अथवा घरगुती एलपीजी सिलेंडर पुरवठादार कंपनीच्या ग्राहकास घरगुती सिलेंडर वेळेवर न देणे,विशेषता सणासुदीच्या काळात गॅस एजन्सी कडून वेळेवर सिलेंडरची पोहोच न देणे, अरेरावी करणे, सिलेंडर पोचविण्यासाठी डिलिव्हरी एजंट कडून अतिरिक्त पैशाची मागणी करणे व त्यासाठी उद्धट वर्तन करणे हे सामान्य जनतेसाठी नित्याचे झाले आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती तर याहून भयानक आहे. शासनाकडून रेशनवर मिळणारे रॉकेल बंद झाल्यानंतर देशातील अनुसूचित जातीसह अन्य विविध घटकांमधील सर्वसामान्य महिलांसाठी आरोग्याचा प्रश्न समोर ठेवून 'उज्वला' योजना शासनाने आणली. त्या अंतर्गत सध्या राज्यभरात मोठ्या प्रमाणावर लाभार्थी आहेत.मात्र,वेळेवर गॅस सिलेंडर मिळत नसल्याने 'उज्वला'च्या डोक्यावर पुन्हा सरपणाची मोळी दिसणार की काय ? अशी शक्यता वर्तविली जात आहे.

> ऑनलाईन बुकिंग झाल्यावर वेळेवर गॅस सिलेंडर पुरवठा करणे बंधनकारक असून कुठल्याही परिस्थितीत ग्राहकांकडून अतिरिक्त रक्कम घेता येत नाही.संबंधित एजन्सीकडे पुरवठा अधिकाऱ्यांना पाठवून योग्य चौकशी करण्यात येईल.
>
> **–विजय भाकरे**
> **अप्पर जिल्हाधिकारी, अहेरी**

> सदर व्यक्तीची प्रकृती ठीक नसल्याने कदाचित उशीर झाला असेल.संबंधित व्यक्ती गॅस सिलेंडर पुरवठा केला नसेल तर मी माझ्या माणसाला सांगून पुरवठा करायला लावणार. **–संतोष दोंतुलवार**
>
> **कन्यका गॅस एजन्सी, अहेरी**

# फ्रेन्डस् अर्बन सोसायटीची वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न




**वर्धा । प्रतिनिधी**

बोरगाव (मेघे) येथील फन्ड अर्बन अॅड रुरल को– ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या. रजी ४०२/०३ सन २२–२३ ची वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दिनांक २४ सप्टेंबर २०२३ रोजी दु. १२ वाजता सत्याश्रम हॉल बोरगांव (मेघे) येथे संपन्न झाली.लोकांच्या अर्थाजनाची क्षमता वाढविण्याच्या ध्यासातून निर्माण झालेल्या संस्थेच्या आमसभेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थाध्यक्ष ज्ञानेश्वर तितरमारे कार्यक्रमाचे उद्घाटक अनंतराव बोबडे, मुख्याध्यापक, उच्च प्राथमिक शाळा, दहेगांव (मि.) हे होते. प्रमुख पाहुणे बोरगांव (मेघे) ये सरपंच संतोष सेलूकर, जिल्हा विकास अधिकारी अमित चिचपाने , विजय सत्यम, अध्यक्ष, लायन्स क्लब व अशोक कडू ,चाफके, मुख्याध्यापक संजय भस्मे के आनंदराव विद्यालय, बोरगाव मेघे तसेच संस्था उपाध्यक्ष निलेशणी ठदकर, सचिव सुनिल सायंकार आदी मान्यवर मंचावर उपस्थीत होते. या कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलाने आणि स्वागत गिताने झाली. प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष निलेश ठवकर यांनी केले. अहवाल वाचन संस्थेचे सचिव सुनिल सायंकार यांनी केले. संस्थेला ऑडीट 'अ' वर्ग मिळाला तसेच संस्थेनी ९ कोटी ९३ लक्षाचे उदिष्टे गाठलेल्या यशाबद्दल मान्यवरांच्या वतीने माहीती पुस्तकीचे प्रकाशन करण्यात आले. आम्हास अभिमान तुमचा या शिर्षका अंतर्गत एकुण २० लोकांचा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला. गुणवंत विदयार्थी खेळाडु सेवानिवृत्त माझी सैनिक, कै. आनंदराव मेधे विद्यालय बोरगांव (मेघे) येथिल १० वी १२ वी मधील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अनंतराव बोबडे यांनी सुंदर असे उपस्थितांना प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपिठावरील प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा शेवटी अध्यक्षीय भाषण ज्ञानेश्वर तितरमारे यांनी केले. संस्था ही १५ कोटीच्या वाटचालीकडे झेप घेत असल्याचा आनंद सर्वाना असल्याचे सांगीतले राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक गजानन दांदडे, सुनिल ढगे, रविंद्र गुळधाणे ,दिलीप चौधरी, प्रमोद लाडेकर, संजय कांबळे, महेश साळवे, अरुणा गाढवे, धनश्री कंडे सभासद दिलीप गाढवे, प्रशांत घोडखांदे व इतर दैनिक अभिकर्ता मनोज हटवार, नंदूभाऊ सायंकार, सुनील चंदनखेडे, किशोर विघरे, संदिप देशमुख, तसेच गजानन देशमुख, आकश् कोसे ,मोहन मोहिते , दादाराव ठवकर , बुदुलाल सुजीया विधाते , वाळके , इंद्रानजी अ करीम उपस्थित होते.बहुसंख्य सभासद, खातेदार, हितचिंतक अभिकर्ते व कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन व्यवस्थापक बादल जोगे, संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैशाली लाडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता संस्थेचे कर्मचारी सरिता नासरे ,शुभांगी लाडेकर, विकेश पाटील, अंकीतराऊत व मिनाक्षी शेंडे इत्यादींचे सहकार्य लाभले.

# भद्रावती येथे संपन्न झाला 'मी आय ए एस होणार'

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्था भद्रावती व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मी आयएएस अधिकारी होणारच हा प्रशिक्षण शिबिर कार्यक्रम भद्रावती येथील श्री साई आय.टी. आय. (जैन मंदिर रोड) भद्रावती येथील सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला व्यासपीठावर नगराध्यक्ष तथा रोटरी अध्यक्ष, अनिल धानोरकर,मार्गदर्शक डॉ. नरेशचंद्र काठोळे, मिलिंद हांडे , मिलिंद राऊत, सुनील भिसे , किशोर पत्तीवार, सुधीर पारधे, विक्रांत बीसेन आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये फेरीलँड स्कूल भद्रावती येथील पन्नास आदिवासी विद्यार्थ्यांसह भद्रावती शहरातील जवळपास ४०० ते ५०० विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. सूत्रसंचालन ग्रीष्मा नागदेवे व रोशनी रामटेके, पाहुण्यांचा परिचय रवींद्र तिराणिक, प्रास्ताविक किशोर पत्तीवार,आभारप्रदर्शन डॉ. ज्ञानेश




हटवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सुधीर पारधी, ड. युवराज धानोरकर, आनंद क्षीरसागर, डॉ माला प्रेमचंद,श्री साई आय. टी. आय. प्राचार्य श्री राजेश नगराळे , कौस्तुभ गाडेकर , ताराचंद उंमरे, विशाल जगताप , सुनील शेंडे, प्रमोद साखरकर, सुप्रिया बाला, अश्विनी भसारकर, उषा पेटकर, विकास बदखल, डॉ. अमित प्रेमचंद, विनोद कांबळे, प्रकाश पिंपळकर, किर्ती गोहणे, किशोर खंडाळकर, सुनील पोटदुखे, अविनाश सिदधमशेट्टीवार, किशोर भोसकर, रुक्साना शेख, संजय बोरकुटे यांनी प्रयत्न केले.

# रोग निदान शिबिरातून आरोग्य जपण्याचा प्रयत्न करा : आमदार प्रतिभा धानोरकर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आरोग्य हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येकाला निरोगी आयुष्य जगता यावे यासाठी सरकारच्यावतीने विविध प्रकारच्या योजना राबवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे, या शिबिराचा उद्देशही जनतेला निरोगी ठेवण्यासाठी आहे. या शिबिरात सर्वांना विविध प्रकारच्या आजारांची तपासणी आणि उपचार मोफत करण्यात येत आहेत.

त्यामुळे नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. वरोरा भद्रावती मतदारसंघाच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते नेहरू शाळा, शेगाव (बु) येथे भव्य रोग निदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात सर्वसामान्य नागरिकांना विविध प्रकारच्या आजारांची तपासणी आणि उपचार मोफत करण्यात आले.या शिबिराचे आयोजन पैगामे रजा सेवा संस्था आणि समस्त मुस्लिम बांधव यांनी केले होते. या शिबिरात डॉक्टर, नर्स आणि इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, डोळे, कान, नाक, घसा, त्वचा, स्त्रीरोग, बालरोग, मानसिक आरोग्य आदी विविध प्रकारच्या आजारांची तपासणी करण्यात आली. तसेच, रुग्णांना आवश्यक ते औषधोपचार आणि सल्ला देण्यात आला.या शिबिरात शेगाव (बु) शहरातील तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी या शिबिराचे स्वागत केले आणि आभार मानले.या शिबिरात आमदार प्रतिभा धानोरकर यांच्यासह, ठाणेदार अविनाश मेश्राम, सरपंच सिद्धार्थ पाटील, अध्यक्ष बशीर भाई कुरेशी, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती राजू चिकटे, उपाध्यक्ष सदनाताई नि. मानकर, माजी सरपंच यशवंत लोडे, सचिव अंसार रजा, डॉ. पठाण साहेब, ता.मु.अ. गजानन ठाकरे, मुख्याध्यापक बालाजी हाकुनकर, अब्दुल रहेमान साहेब, मो. शफी शेख आदी मान्यवर उपस्थित होते.



# शिक्षक पात्रता परिक्षेत पहिल्याच प्रयत्नात गोंडपिपरीच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्याची ओळख उद्योगविरहीत अशी असून तालुक्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगार युवकांची फौज निर्माण झाली आहे.अशा स्थितीत युवक मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे अनेकांना यशही मिळत आहे.विविध विभागात नौकरी लागण्याचा टक्काही तालुक्यात वाढताना दिसत आहे.अशा स्थितीत नुकतेच तालुक्यातील चार विद्यार्थ्यांनी शिक्षक पात्रता परीक्षेत यश मिळवल्याने तालुक्यातील नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



केंद्रीय शिक्षा बोर्डच्या माध्यमातून २० ऑगस्ट २०२३ ला घेण्यात आलेल्या सि.टी.ई.टी परिक्षेचा निकाल दि.(२५) सोमवारी लागला.या परिक्षेत दलित मित्र वि.तु.नागपुरे डी एड कॉलेजच्या विद्यार्थीनिंनी पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले.सदर विद्यार्थी डी.एल.एड(डी.एड)द्वितीय वर्षात शिक्षण शिकत आहेत.यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये देवराव खेकारे,पल्लवी कोल्हे,उज्वला बामनकर,स्नेहल कोहपरे यांचा समावेश आहे.यश संपादन करणाऱ्या विद्यार्थीयांचे कॉलेजच्या प्राचार्य ,अध्यापक व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून कौतुक व अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# इंद्रप्रस्थ न्यू आर्टस्,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**वर्धा । प्रतिनिधी**

इंद्रप्रस्थ न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथे २४ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात राष्ट्रीय सेवा योजना दीन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष ससणकर उपस्थित होते तसेच प्रमुख पाहुणे डॉ प्रशांत कडवे प्रमुख मार्गदर्शक डॉ हेमंत मिसाळ , डॉ प्रमोद आचेगावे , प्रा दिपाली पवार ,प्रा बहुरूपी, प्रा खोब्रागडे ,प्रा. ढेपे, प्रा. प्रतीक्षा कोल्हे, डॉ निशांत चिकाटे हे मंचावर उपस्थित होते . या दरम्यान रा से यो च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान केले आणि नंतर विद्यार्थांना प्राचार्य डॉ आशिष ससणकर यांनी रा से यों दिनाच्या निमित्त मार्गदर्शन केले तसेच प्रमुख पाहुणे डॉ प्रशांत कडवे यांनी रा से यो मधून कसा विद्यार्थी घडतो हे स्पष्ट केले. रा से यो कार्यक्रम अधिकारी डॉ हेमंत मिसाळ यांनी रासेयो चे महत्व, उद्देश, कार्य समजाऊन सांगितले कार्यक्रमाचे संचालन प्रा सिद्धांत ढोके यांनी केले तर आभार योगेश रावले यांनी मानले




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .